ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-III October 2013

# शांततेसाठी शिक्षण

प्रा. अमरदीप अशोक रामराजे,
सहाय्यक प्राध्यापक,
महात्मा गांधी विद्यामंदीर संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प, नाशिक.

जगात प्रत्येक व्यक्तिला शांतता ही गरजेची वाटते. शांतताही मानवाच्या जीवनातील अंतिम व महत्त्वाची बाब बनत चाललेली आहे. शांततेशिवाय विकास होवू शकत नाही व त्याची सुरवातही होवू शकत नाही. जगामध्ये दहशतवाद, अराजकता, अस्थैर्य वाढते, गुन्हेगारीचे प्रमाण या समस्यांनी थैमान घातलेले आहे. यामुळे शांततायुक्त असे वातावरण दिसत नाही आज ही जातीव्यवस्था, धर्मव्यवस्था नष्ट न होता तीची मुळ अजुन भक्कम करण्याचा काही लोकांचा मानस दिसतो आणि त्यानुसार ते आपले कार्य अतिशय जोमाने व संघटितपणे करत आहेत. याचा परिणाम म्हणजे आजचा समाज शांततामय समाज न बनता अशांततामय समाज बनत आहे. जातीधर्म व्यवस्थेप्रमाणे आजही आर्थिक घटक, अनावश्यक सुखसोयिंचा हव्यास हा शांतता निर्माण होण्यातील मोठा अडथळा ठरत आहे. आज आर्थिकतेवर आधारित समाज हा पूर्णपणे दुभंगताना दिसून येत आहे. त्यानुसार गरीब–श्रीमंत हा भेद निर्माण झालेलाच आहे. पण त्याचबरोबर या दोघांमधील दरी हि वाढलेली
दिसते.

या गोष्टी कमी होण्यासाठी शांतता निर्माण होण्यासाठी स्वातंत्र्य समानसंधी दुर्बलांच्या विकासाला विशेष संधी आणि या सर्वांसाठी जनतेने सुशिक्षित आणि सज्ञानी होणे हो एकमेव पर्याय उपलब्ध आहे.

भारत हा देश शांततामय देश आहे. शांततेचे दूत याच मातीत जन्मलेले आहे. विश्वशांतीचा संदेश देणारे गौतम बुध्द, रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी ते भारताचे पहिले पंतप्रधान शांतीदूत पंडित जवाहरलाल नेहरु ही सर्व परंपरा याच देशाची त्यामुळे शाळा, महाविद्यालयातून शांततेसाठी शिक्षणाची वैचारिकता बांधली जावून त्याची गरज निर्माण झाली प्रत्येक मानसात स्वतंत्र चिकित्सक विचार व निर्णयक्षमता यायला हवी त्यासाठी शिक्षण ही शांततामय संदेश देण्यासाठी सक्षम असायला हवे.

सद्यस्थितीही दहशतवाद, अत्याचार, अमानवी अतिरेकी वृत्ती, सुडबुध्दी, समन्वयाचा अभाव, भावनिक उद्रेक, व्यवस्थेची चीड, दैनंदिन ताणतणाव, व्देषभावना या बाबी मोठया प्रमाणात वाढीस लागल्या आहेत. यातून मनाचे अस्तित्व, समाजाचे, देशाचे व त्याबरोबर जगाचे अस्तित्व कायमचे टिकवायचे असेल तर शांततेसाठीच्या शिक्षणाची गरज आहे.

जगात शांतता निर्माण होण्यासाठी दुस—या महायुध्दानंतर १९४५ ला UNO ची स्थापना झाली याचा मुख्य हेतू राष्ट्राराष्ट्रातील मतभेद दुर करुन शांत प्रस्थापित करणे हा होता. पुढे UNESCO ची स्थापना झाली. स्वीडनमध्ये "The Peace Association of Swedish School" ची स्थापना झाली.

याचप्रमाणे भारतात शांततेच्या अभ्यासासाठी व शिक्षणासाठी गुजरात मध्ये M.A. च्या अभ्यासक्रमात याचा समावेश करण्यात आला. शिवाजी विद्यापीठात गांधी अभ्यासकेंद्र सुरु करण्यात आले व JNU मध्ये शांततेसाठी राजीव गांधी केंद्र सुरु करण्यात आले.

**शांतता :**

" सहिष्णूता, लोकशाही, पारदर्शकता, अहिंसा व संवाद यावरील विश्वास, निशस्त्रीकरण, स्त्री—पुरुष समानता, आर्थिक आणि सामाजिक न्याय या सर्वांना मिळून शांतता प्रस्थापित होतो "

ज्ञानेश्वरीमध्ये " ज्ञेयाला जिरवून जेव्हा ज्ञाता आणि ज्ञान दोन्ही तयाला जातात तेव्हा त्या स्थितीला शांतता असे म्हणतात. "

**UNESCO -**

" Respect for life ending og violence and promotion and practice of non-violence through education dialogue co-operation "

**Encyclopedia -**

" Freedom from quarrels and disagreement harmonious relations "

**शांततेसाठी शिक्षणाची संकल्पना :**

ज्ञान, तंचविज्ञान, विज्ञान यातील शोध उपयोगी बाबी सदसदविवेकबुध्दिने उपयोगात आणावयाच्या बाबी आहेत अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना सज्ञान करण्यासाठी व त्यांना
दिशाहिणतेकडुन योग्य दिशेकडे आणण्यासाठी दुरप्रवृत्तींना सत्प्रवृत्तीकडे वळवण्यासाठी शांततामय शिक्षणाची गरज आहे.

सद्यकाळात होणारे महाविद्यालयीन प्रकरणे, अपहरण, खुन, बलात्कार अशा बातम्या ख—या अर्थाने प्रत्येक व्यक्तीला अस्वस्थ अशांत बनवत आहे दृ सुरक्षिततेबाबत साशंकता निर्माण करत आहे. यातून सुटका करुन घेण्यासाठी एक महत्त्वाचे माध्यम शांततेसाठी शिक्षण होय. नैतिक मूल्यांची होणारी हेडसाळ, आदर्शाचा अभाव, संस्कारहिनता अशा विविध बाबिंचा विचार शांततेसाठी शिक्षण या माध्यमातून करणे गरजेचे आहे.

NCERT Curricular Frame Work 2005 ने व्याख्या केली आहे. —

" स्वत:बरोबर आणि निसर्गासहित इतरांबरोबर सुसंवाद साधण्यासाठी आवश्यक असणारी मूल्ये, दृष्टीकोन आणि कौशल्य रुजविण्यासाठी दिले जाणारे शिक्षण म्हणजे शांततेसाठी शिक्षण होय. "

**शांतताप्रमुखत: दोन पातळयांवर विभागता येईल :**

वैयक्तीक पातळी सामाजिक पातळी

- वैयक्तीक पातळी –

  प्रत्येक माणूस हा काणत्या ना कोणत्या कारणाने असमाधानी असतो आर्थिक कारणाने असेल कींवा नोकरीच्या कारणाने यासारख्या अनेक कारणाने प्रत्येकाचे मन हे अतृप्त अशांत असते. प्रत्येकाच्या मनात या ना त्या कारणाने मानसिक गोंधळ वा अशांतता पहावयास मिळते. व्यक्तीने आपले जीवन सामंजस्याने , समाधानाने सामाजिक बांधिलकी जपत तृप्ततेने व्यथित करणे म्हणजे वैयक्तीक शांतता निर्माण होणे होय.

- सामाजिक पातळी –

  समाजातील प्रमुख घटक हा व्यक्ती होय अनेक व्यक्तींचा मिळून समाज तयार होतो. त्यामुळे समाजाची शांतता ही वैयक्तीक शांततेच्या पायावर आधारीत असते. जागतिक शांतता नांदावी या साठी विश्वबंधुत्वाची संकल्पना रविंद्रनाथ टागोरांनी मांडली. विकासाकडे वाटचाल करतांना सद्विचारांची देवाणघेवाण करणे हे केवळ स्वत:पुरते मर्यादित न ठेवता इतरांचा विचार करावा. व्यापक विचार हिच समाज पातळी आहे. हाच सामाजिक पातळीवर शांतता निर्माण करण्याचा मार्ग आहे. हिंसाचार, वाद, सामाजिक व वैयक्तीक कलह यांना टाळून शांतता नादवण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**शांतता शिक्षणासाठी शाळेची भूमिका :**

शालेय वातावरणात दिले जाणारे शिक्षण व त्याला अनुषंगुन दिल्या जाणा–या शैक्षणिक अनूभूती या विद्यार्थ्यांला सर्वांगिण विकासासाठी तर दिल्या जातात पण समाजात निर्माण होणा–या कलहापासून स्वत:चे संरक्षण करण्याची क्षमता पण विद्यार्थ्यात निर्माण करण्याचा प्रयत्न शाळेणे करावयास हवा. या साठी समाजातील सर्व घटकांची जाणीव विद्यार्थ्याला करुन द्यायला हवी तसेच त्यातील चांगल्या व वाईट गोष्टींची जाण व त्या ओळखण्यास त्याला मदत करायल हवी. तसेच त्याच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यास मदत करावी. शालेय वातावरण भयमुक्त व आनंदमय असावे. विश्वऐक्याची व त्याचप्रमाणे

विश्वबंधुत्वाची भावणा विद्यार्थ्यामध्ये रुजवावी. यासाठी अभ्यासक्रमाची रचना व अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेल्या आशयाची योग्य निवड केलेली असावी. निवडक अशा ऐतिहासिक घटना सांगुन विद्यार्थ्याला भूतकाळातील कलहाची अशांततेची जाणीव करुन देणे व त्याचे दुष्परिणाम त्याला सांगावे तसेच समाजसुधारक व त्यांचे कार्य सांगावे यातून चांगल्या वाईट गोष्टी ओळखण्यास त्याला मदत होईल यातून शांततेचे व आदर्शयुक्त जीवन त्याला जगता येईल. स्पर्धा असाव्यात पण त्या निकोप असाव्यात हेवेदावे परस्परांबद्दल मत्सर निर्माण होणा—या नसाव्यात. सर्वसमावेशक शिक्षणाचीह व्यवस्था असावी. शाळेतील विविध घटकांतील आंतरक्रिया विधायक असायला हव्यात.

**शांततेसाठी शिक्षकाची भूमिका :**

शांततेसाठी शिक्षकाची भूमिका फार महत्त्वाची आहे. कारण त्याच्या समोर असणारा विद्यार्थी हा भविष्यातील नागरिक असतो त्याच्या शालेय जिवनात जे संस्कार होतील तेच घेवून तो भविष्यात वावरणार असतो त्याचे चांगले संस्कार झालेले असतील तर तो नैतिकतेने व शांततेने आपले जीवन जगेल पण वाईट संस्कार झालेले असतील समाजात तो अशांतता निर्माण करु शकेल . या संस्कार करणारा महत्त्वाचाा घटक हा शिक्षक फार महत्त्वाचा आहे. शिक्षकाचे वर्तन आदर्शयुक्त असावे तसेच त्याला समाजातील सर्व घडामोडींची जाणीव असायला हवी. तो जागरुक असायला हवा. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करणारा व त्यांच्या समस्या सोडविणारा असावा. त्यांच्याशी निपक्षपातीपणे वागणारा असावा त्यांच्या विषयी आपुलकीची भावणा त्याच्यात असावी. शिक्षकाचे जिवनमान शांततामय असावे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारा असावा. शांततेचे महत्त्व त्याला ठावूक असावे.

विद्यार्थ्यांमध्ये शांततेचे संस्कार व मूल्य रुजवण्यासाठी तो सदैव तत्पर असावा. विविध प्रकारच्या कथेमधुन, प्रकल्पातून त्याने शांततेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून द्यावे. एकमेकांना समजून घेवून स्नेह जपणारा असावा. स्वत:चे दोष व मर्यादा यांची जाणीव असणारा असावा. सदैव अध्ययनशील राहून स्वत:आधी मूल्यांचा स्वीकार करणारा असावा. अभ्यासक्रम, विद्यार्थी व पालकांच्या अपेक्षांचे ज्ञान असावे. वर्ग व शाळेतील वातावरण सुरक्षित व प्रेरणादायी निर्माण करणारा असावा. शिस्तिच्या बाबतीत न्याय व सातत्य असावे. मनापासून , जाणीवपूर्वक व ऐकोप्याने सेवा देण्यास तत्पर असावे.

थोडक्यात व्यक्तीचा विकास व त्याच प्रमाणे समाजाचा विकास घडवून आणायचा असेल तर त्या साठी त्याच्याअंगी संयमीवृत्ती असावी यामुळे आपोआपच त्यांचे कोणतेही काम हे शांततेने व योग्य दिशेने होण्यास मदत होईल आजच्या सद्यस्थितीचे निरीक्षण केले असता. व्यक्तिवर योग्य संस्कार व मूल्य रुजवण्याचे काम शाळेमार्फत करता येईल व तसेच शांततामय मार्गाने जीवण जगण्यास त्याला शिक्षण मदत करेल.

**संदर्भग्रंथ सूची :**

१. भोसले, रमा आणि डोणे, उज्वला शिक्षणातील बदलते विचारप्रवाह, कोल्हापूर

२. डॉ. व्ही. के. कदम वर्तमान शिक्षण शिक्षक–शिक्षण, नागपूर

३. प्रा. अरुन सांगोलकर नवीन जागतिक समाजातील शिक्षणाचे विचारप्रवाह, नाशिक

४. डॉ. किशोर चव्हाण शिक्षण तरंग, नाशिक